# बनवूया भारताला एक ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था



सर्वप्रथम शिक्षणाच्या क्षेत्राचा ''**आराखडा**'' **(Matrix)** समजावून घेणे गरजेचं आहे. आपल्या देशाच्या **मानवी भांडवलाच्या विकासाच्या** दृष्टिकोनातून विचार करता, स्वातंत्र्य मिळून ५९ वर्षे झाल्यानंतरही खालील स्थिती कायम राहिली आहे:

१. बालवाडी ते १०+२ ह्या शालेय शिक्षणक्रमातील (जे कधी शाळेत गेलेच नाहीत, त्यांच्यासह) **शिक्षण अर्ध्यावर सोडलेल्यांचे** प्रमाण ९०% ते ९४% आहे.

२. **चीन**मध्ये सुमारे १८ लाख शाळा आहेत तर भारतामध्ये सुमारे ९ लाख ५० हजारच शाळा आहेत!

३. सरकार चालवत असलेल्या शाळांमधील **'प्रशासन'** हे खूपच सुमार आहे. भारताच्या ग्रामीण आणि नागरी भागातील शाळांमधील बरेचसे शिक्षक हे गैरहजर असतात (१५% ते ५०% गैरहजेरी) आणि तरीही त्यांना पूर्ण पगार व भत्ते मिळत असतात! अभ्यासांमधून असं दिसून आलंय की अगदी गरीबातील गरीब लोकंही आपल्या मुलांना सरकारने चालवलेल्या मोफत शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये न पाठवता, विना-अनुदानित शाळांमध्ये पाठवतात, जेथे त्यांना 'फी' भरावी लागते. अशा विना-अनुदानित शाळांमध्ये **शालेय शिक्षणाचा दर्जा** सरकारी शाळांपेक्षा अधिक उच्च असतो आणि तरीही, सरकारी शाळांमधील शिक्षकांचे वेतन हे विना-अनुदानित शाळांमधील शिक्षकांपेक्षा दोन ते तीनपट अधिक असतं.

४. **साक्षरतेची भारतातील विद्यमान व्याख्या** (तुम्ही तुमचं नाव लिहू शकत असाल तर तुम्ही साक्षर आहात) ही आंतरराष्ट्रीय मानदंडांच्या अनुसार बदलणे गरजेचं आहे.

५. मानवी संसाधन विकास (एचआरडी) मंत्रालयाच्या अनुसार **निरक्षरतेचे** प्रमाण केवळ ३७% आहे किंवा ४३ कोटी लोकच निरक्षर आहेत, तर युनिसेफ आणि यूएनडीपीच्या अनुसार हेच प्रमाण सुमारे ६०% किंवा ६५% कोटी एवढे आहे. **चीनमधील साक्षरतेचे प्रमाण सुमारे ९३% आहे.**

६. भारताला 'ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था' बनवण्यासाठी उचलावयाचे पहिले पाऊल **साक्षरता** हे आहे आणि त्याला **सर्वोच्च प्राधान्य** देणं गरजेचं आहे.

७. **शिक्षणावर दर वर्षी सुमारे** रु. ९१,००० कोटी खर्च केले जातात. ज्यापैकी १५% हिस्सा हा केंद्र सरकारचा तर ८५% हिस्सा हा राज्य सरकारांचा असतो. तर शैक्षणिक करापोटी दरवर्षी आणखी रु. ७,००० कोटी गोळा केले जातात. ही रक्कम जीडीपीच्या सुमारे ३.३% आहे. 'एमएचआरडी'ने केलेल्या हिशोबाच्या अनुसार प्राथमिक शिक्षणासाठी दरवर्षी आणखी रु. ४०,००० कोटींची गरज आहे.

८. १०वी पर्यंतचे वाजवी दर्जाचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देण्यासाठी, आमच्या अंदाजानुसार आणखी **रु. १,००,००० कोटींची गरज आहे,** ज्यावर केंद्र आणि राज्य सरकारांनी पुढील १० ते २० वर्षे लक्ष केंद्रित करणे गरजेचं आहे किंवा किमान ९५% जनता साक्षर बनेपर्यंत आणि किमान ८०% लोकसंख्येने उच्च शिक्षणाचा टप्पा वा १०वी इयत्ता पूर्ण करेपर्यंत शिक्षणक्षेत्रामध्ये लक्ष घालणे गरजेचं आहे.

## *Education 1st* चा उपक्रम

९. आमच्या अंदाजाच्या अनुसार **शिक्षणाचा एकूण खर्च हा जीडीपीच्या सुमारे ८%** आहे, ज्यातील सुमारे **३.३%** सहभाग सरकारचा तर **सुमारे ४.७% हा खाजगी असतो.** ह्यामध्ये विना-अनुदानित शाळांमधील आणि महाविद्यालयांमधील निधीसंकलन + लाचेची रक्कम व कॅपिटेशन फी + परदेशात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिले जाणारे पैसे + ट्यूशन क्लासेस + कोचिंग क्लासेस + प्रायव्हेट आय.टी. व सॉफ्टवेअर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट्सचा अंतर्भाव आहे. ह्यापैकी बहुतांश खाजगी निधी संकलनाचा विनियोग हा जेथे केवळ ३०% लोकं रहातात अशा नागरी भागांमध्ये केला जातो.

१०. १० + २ शिक्षणक्रम (विद्यापीठ-पूर्व) पूर्ण करणाऱ्या **युवकयुवतींपैकी सुमारे ७% ते ८%,** हे भारतातील १७,९६३ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतात. पदवीधरांपैकी ७०% पदवीधर बी.ए. किंवा कलाशाखेचे पदवीधर असतात. हे आजच्या काळाशी अनुरूप आहे का? ह्यापैकी बहुतांश **तथाकथित पदवीधर हे नोकऱ्या मिळवण्यासाठी सक्षम ठरत नाहीत.**

११. सर्व नव्या नोकऱ्यांपैकी सुमारे ६०% स्वयंरोजगारामध्ये असतात. **नवीन नोकऱ्यांची स्थिती अशी आहे - १%** सरकारी, **२%** खाजगी 'संघटित क्षेत्र' आणि **९७%** 'असंघटित क्षेत्र'.

१२. सध्या **शिक्षण आणि नोकऱ्यांची निर्मिती आणि जीवनमान ह्यांचा परस्परसंबंधी अत्यंत क्षीण आहे.**

१३. कर्मचाऱ्यांच्या संघटना, चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि अन्य व्यवसाय संस्था ह्यांचा परस्परांशी नीट ताळमेळ साधलेला नाही. भारतामध्ये ''**मनुष्यबळाचे शिक्षण आणि प्रशिक्षण**'' ह्यासाठी कोणताही **किमान सामायिक राष्ट्रीय कार्यक्रम (National Common Minimum Program)** नाही. बहुतांश विकसित आणि विकसनशील देशांमध्ये (कर्मचारी आणि उद्योगधंदे/व्यवसाय ह्यांचे प्रतिनिधित्व करणारे) **चेंबर ऑफ कॉमर्स, आघाडीचे नेतृत्व** करते.

१४. **दरवर्षी सुमारे २ कोटी ७० लाख लोकांची विद्यमान शिक्षण यंत्रणेमध्ये भर पडत असते,** जे दरवर्षी आणखी ऑस्ट्रेलिया + हॉंगकॉंग + सिंगापूर आणि यूएई ह्यांची भर पडण्यासारखे आहे.

१५. सध्या केंद्र सरकार तसेच राज्य सरकारे ही **जीडीपीच्या ९% ते ११% वित्तीय तुटवड्यामध्ये चालत आहेत.** त्यामुळे शिक्षणासाठी अतिरिक्त वित्तपुरवठा करावा लागल्यास त्यांच्या विद्यमान बजेट्सवर तर ताण येईलच, परंतु निधी सध्या ज्यांच्यासाठी योजण्यात आला आहे, अशा अन्य क्षेत्रांवरही दबाव पडेल.

१६. भारतातील सर्व उच्च आणि तांत्रिक शिक्षण हे **'परवाना राज्या'**वर चालते. ज्यांच्याकडे जागतिक जीडीपीच्या सुमारे ५०% हिस्सा आहे अशा यूएसए जर्मनी आणि जपान ह्या तीन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांबरोबर आपण ही स्थिती ताडून पाहू. भारताप्रमाणे त्यांची सरकारेही तत्सम निर्बंध घालतात का? आपण त्यांच्याकडून काही शिकू शकू का? ह्या देशांमधील संस्थांमध्ये अटीतटीची स्पर्धा असते ती नैपुण्याबाबत!

१७. **चीन**मध्ये **सुमारे ९०० विद्यापिठे** आहेत, तर आपल्या **भारतात ३६२ विद्यापिठे** आहेत, **यूएसएमधे ३६५० आणि जपानमध्ये हीच संख्या ४०००** आहे.

१८. भारतामध्ये शिक्षणक्रमांच्या **फी**, शिक्षकांच्या **वेतनश्रेणी**, संस्थाप्रमुखांची **नेमणूक** तसेच **अभ्यासक्रम** ह्याविषयी केंद्र व राज्य सरकारच्या ५८ पेक्षाही अधिक शिक्षण मंडळाकडून ठरवलं जातं. ह्या प्रक्रियेतून **अभिनव सुधारणा, नैपुण्य आणि जागतिक दर्जाचे विद्यार्थी** तयार होणे शक्य आहे का?

१९. **कोचिंग व्यवसाय** हा **शिक्षण व्यवसायापेक्षा** अधिक फोफावतो आहे. आयआयटी, आयआयएम आणि काही प्रतिष्ठित मॅनेजमेंट स्कूल्ससाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेशपरीक्षांसाठी सुमारे ६,००,००० अर्ज येतात. (ज्यासाठी प्री-कोचिंगवर प्रत्येकी सुमारे **रु. २.०० लाख** खर्च होतात, ह्या हिशोबाने ६,००० सीट्ससाठी

दरवर्षी **रु. १२,००० कोटींची** उलाढाल होते.) ह्या संस्था त्यांच्या शिकवण्याच्या बजेटवर फार तर रु. ८०० ते रु. ११०० कोटी खर्च करतात!

२०. विकसित आणि विकसनशील देशातील ७५% ते ८५% तरूणवर्ग हा **व्होकेशनल एज्युकेशन आणि ट्रेनिंगद्वारे** १४ ते ३५ ह्या वयांच्या दरम्यान एखादे **कौशल्य** वा **स्पर्धाक्षमता** वा **व्यापार** शिकत असतो. भारतामध्ये हे प्रमाण जेमतेम **२% ते ४%** आहे.

२१. भारतामध्ये सुमारे ५११४ आयटीआय (मजूर मंत्रालय) आणि सुमारे ६००० व्होकेशनल स्कूल्स (मानवी संसाधन विकास मंत्रालय) आहेत, तर **चीनमध्ये** सुमारे **५००,००० सीनीयर सेकंडरी व्होकेशनल स्कूल्स** आहेत.

२२. भारतामध्ये १८ ते ५० ह्या वयोगटातील सुमारे ३० कोटी कार्यक्षम लोक बेरोजगार आहेत, पण त्यांच्याकडे **त्यासाठी कोणतेही कौशल्य नाही** आणि त्यामुळेच त्यांना काम मिळू शकत नाही! भारतातील मालकांना **कुशल मनुष्यबळाचा प्रचंड तुटवडा** जाणवत असतो. भारतातील कुशल मनुष्यबळाचे वेतन आणि पगार झपाट्याने वाढत नाहीत. भारतातील तरूणांना जर संबंधित आणि दर्जेदार शिक्षण आणि प्रशिक्षण मिळालं नाही तर भारताला आपल्या प्रचंड लोकसंख्येच्या जोरावर होणारे संभाव्य फायदे करून घेणे शक्य होणार नाही.

२३. राष्ट्रीय पातळीवरील VET प्लॅनिंगचा विचार करता आम्हाला मजूर मंत्रालय आणि मानवी संसाधन विकास मंत्रालय ह्यांच्यात **कोणतेही परस्पर-सहकार्य दिसून आले नाही.**

२४. आपल्याला भारतात अद्यापही हेच कळलेलं नाही की जगातील **शिक्षण हे आय.टी. वा सॉफ्टवेअरच्या ५ पट किंवा ५००%** अधिक मोठे आहे.

२५. १० ते २० वर्षांनंतर भारत हे जगातील **'शैक्षणिक मोहोळ'** म्हणून उदयाला येऊ शकेल आणि **दर वर्षी US$१०० बिलियन** कमावू शकेल! मात्र आपण आता सुरूवात करायला हवी आणि त्यासाठी **१९९१ साली** आपण जसं **व्यवसायांमध्ये** केलं तसंच 'परवाना राज' प्रथम **हरवायला** हवं! भारतामध्ये सुमारे **७,७००** परदेशी विद्यार्थी आहेत तर ऑस्ट्रेलियामध्ये **३६३,०००** परदेशी विद्यार्थी आहेत.

२६. **उच्च आणि तांत्रिक शिक्षणामध्ये** 'परवाना राज' असल्या कारणाने दरवर्षी भारतातील सुमारे ११०,००० ते १२०,००० विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी जातात. कोणताही कालावधी पकडला तरी हे ३५०,००० विद्यार्थी दरवर्षी देशातील सुमारे यूएस १० बिलियनच्या किंवा रु. ४६,००० कोटींच्या परकीय चलनाचा ओघ बाहेर नेतात, जो **दरवर्षी सुमारे ४० आयआयएम किंवा २० आयआयटी** उभारण्यासाठी पुरेसा असतो.

२७. **सध्याची राखीव जागांची समस्या** ही विद्यार्थ्यांच्या गरजा आणि आकांक्षा ह्यांची पूर्तता करू शकत नाही. भारताला गरज आहे ती आणखी अनेक शैक्षणिक संस्था, जागा (सीट्स) आणि उच्च व तांत्रिक शिक्षणातील उच्च गुणवत्तेची. रेशनिंग, कोटा आणि आरक्षण प्रत्यक्ष स्थितीला कधीही भिडू शकत नाहीत. केंद्र आणि राज्य सरकारे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी गरजू आहेत. ह्याच्यावरचा **तोडगा आहे तो म्हणजे उच्च आणि तांत्रिक शिक्षणाच्या सर्व प्रकारांचे विनियंत्रण करणे;** ज्या तऱ्हेने १९९१ मध्ये उद्योगधंदे विनापरवाना केले गेले.

२८. १९४७ पासून **आपण पोलाद,** सिमेन्ट, **रंगीत टीव्ही, हवाईसेवांची तिकिटे, गाड्या, स्कूटर्स** वगैरेंसाठी **आरक्षण** व नियंत्रण करून पाहिले आणि **आपले प्रयत्न निष्फळ ठरले. अखेरीस पुरवठ्यांमध्ये वाढ घडवल्याने तसेच नियंत्रणाद्वारेच ह्या समस्यांचे निवारण करण्यात यश आले.**

## भारताला जर ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था बनवायचं सेल तर आपल्याला खालील गोष्टी करणे गरजेचं आहे:

१. पुढील १० वर्षांमध्ये **९५% ते १००% साक्षरतेचे** लक्ष्य समोर ठेवायला हवे.

२. सर्व **प्राथमिक शाळांच्या** व्यवस्थापनाचे विनियंत्रण करून त्यामध्ये पंचायती, ग्राम गट, नगरपालिका आणि स्थानिक नागरिकांचे गट अशांना सामावून घ्यायला हवे. **जनसमूहांकडे व्यवस्थापनाची जबाबदारी सोपवायला हवी.**

३. शाळेतील मुलामुलींना **'शैक्षणिक कुपने' वापरायला देण्यासंबंधी आणि ती जारी करण्यासंबंधी विचार करायला हवा** ज्यामुळे मुलंमुली आपल्या आवडीची शाळा निवडू शकतील आणि भारताच्या ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये सरकारद्वारे चालवण्यात येणाऱ्या शाळांसाठी विखुरला जाणारा निधी हा बाहेर चुकता केला जाईल. पहा: www.ccsindia.org

४. शिक्षणामध्ये नावीन्य, कल्पकता आणि नैपुण्य ह्यांना पुरेसा वावय मिळण्यासाठी ११वी व त्यानंतरच्या उच्च आणि तांत्रिक शिक्षणामधील 'परवाना राज' संपुष्टात आणायला हवं. पहा: www.epsfi.org

५. १४ ते ५० वर्षे **ह्या वयोगटातील ८०% ते ९०%** लोकसंख्या ही कोणत्या ना कोणत्या प्रकारचे संबंधित **'व्होकेशनल एज्युकेशन आणि ट्रेनिंग'** घेत असल्याची खात्री करून घ्या. पहा: www.wakeupcall.org

६. ५वी ते १२वी च्या वर्गांसाठी **एंटरप्राइज स्किल्स एज्युकेशन, ईएसडी** सुरू करायला अनुमती द्या. ह्यामुळे तरूणांना जगात प्रत्यक्षात काम कसं चालतं ते शिकवलं जाईल. ह्यासाठी दरवर्षी केवळ १०० तास पुरेसे आहेत. भारतातील ६०% पेक्षा अधिकच कष्टकरी हे स्वयंरोजगारामध्ये व्यस्त आहेत. पहा: www.deispune.org

७. **सर्व उच्च माध्यमिक शाळांमध्ये** व्होकेशनल एज्युकेशन आणि शेतीचा अंतर्भाव करून त्यांचा दर्जा उंचावायला हवा तसेच पूर्ण वेळ समुपदेशकही नेमायला हवेत.

८. शिक्षण क्षेत्र-उद्योग क्षेत्र-व्यवसाय-आर अँड डी-चेंबर्स ऑफ कॉमर्स-विद्यार्थी मंडळे-पालक संघटना-नागरी संस्था आणि विना सरकारी संस्था अशा **सर्व हितसंबंधियांमध्ये अत्यंत ओजस्वी परस्पर संवाद घडायला हवा. मालक आणि व्यवसाय ह्यांचे** प्रतिनिधित्व करणाऱ्या चेंबर्स ऑफ कॉमर्सने **ह्या आघाडीचे नेतृत्व करावे.**

९. वरील विभाग एक मधील मुद्दा क्र. ८ मध्ये उल्लेखलेली उद्दिष्टे साध्य होईपर्यंत शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांमध्ये **खाजगी वित्तसहाय्य आणि सहभागाला अनुमती द्यायला हवी.**

१०. पुढील २० वर्षांसाठी किंवा वरील विभाग एक मधील मुद्दा क्र. ८ मध्ये उल्लेखलेल्या मानदंडांची पूर्तता होईपर्यंत खाजगी आणि अनिवासी भारतीयांसाठी **'कर-विश्राम आणि उत्तेजनांना'** अनुमती द्यायला हवी.


*i Watch*

Edited, Published and Printed for *Education 1st* by Krishan Khanna. He is from IIT, Kharagpur. Between 1961 to 1992 he was responsible for 14 joint ventures and business partnerships with 14 different countries around the World. In 1993 he took 'Sanyas' from business for Nation Building and **Transforming INDIA**.

Krishan Khanna is Chairman - Vocational Education & Training Committee – **EPSI,** Educational Promotion Society of India, New Delhi. Co-Chairman - Committee on Education & Industry Co-operation, - **PHDCC&I,** New Delhi, Member - CII National Committee on Education, New Delhi, Director - Vocational Services, **Rotary International,** Rotary District 3140, Bombay Mid Town, Bombay, Member **Planning Commission** Committee on Secondary Education & Vocational Education, New Delhi, Member 11th Plan Committee of **IGNOU,** New Delhi, Advisor - Vocational Education & Training, Times Foundation, New Delhi, Member **FICCI** National Committee on Education, New Delhi, **ASSOCHAM** National Committee on Education, New Delhi, Member 11th Plan Working Group of the **Ministry of HRD,** New Delhi and Member of the Board of the **AICTE,** New Delhi. The views and opinions expressed are Krishan Khanna's personal views and some points may not be accepted by some or all of the above mentioned organizations.



Feedback & comments to *i Watch* 211, Olympus, Altamount Road, Mumbai 400 026. Email krishan@wakeupcall.org
Website: www.wakeupcall.org Tel +91 22 2353 5466 Fax +91 22 2353 6782. *Education 1st* is a division of *i Watch*


वाचकांसाठी संदेश: **कृपया हे प्रकाशन तुमचे मित्रमैत्रिणी आणि सहकारी तसेच तुमच्या नजीकच्या स्थानिक शाळेतील वा कॉलेजातील एका शिक्षकाकडे पाठवा.**

Organizations which have supported us in the past

TIMES FOUNDATION THE TIMES GROUP · EPSI The Knowledge Vehicle · VOTE INDIA · IndianNGOs.com · hudco · IDFC · WORLD COUNCIL FOR CORPORATE GOVERNANCE · CMS · HDFC · TATA · shaadi.com The World's Largest Matrimonial Service · ROTARY INTERNATIONAL